# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ९५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०२ ज्येष्ठ शके १९४८, शनिवार दि.२३ मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### नीट युजी परीक्षा आणि पेपर फुटीचे रहस्य हे एक मोठे कोडे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

नीट युजी परीक्षा आणि पेपरफुटीचे रहस्य हे एक मोठे कोडे बनले आहे, कारण एकीकडे एनटीए (सारख्या संस्था परीक्षा सुरळीत पार पडल्याचा दावा करतातपेपर फुटलाच नसल्याचा दावा करतात तर दुसरीकडे समोर येणारे पुरावे आणि सीबीआय तपासातून परीक्षा पद्धतीत प्रचंड गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट होते.

एनटीएच्या अधिकाऱ्यांनी संसदीय समितीला आणि सर्वोच्च न्यायालयात माहिती देताना असा युक्तिवाद केला होता की, देशभरात कुठेही संपूर्ण प्रश्नपत्रिका बाहेर आलेली नाही. त्यांच्या मते, काही मोजके प्रश्न परीक्षेच्या काही वेळ आधी सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. एनटीएचा असा दावा होता की त्यांची डिजिटल सुरक्षा, कडक तपासण्या आणि परीक्षा केंद्रांवर होणारे कडक नियम यामुळे संपूर्ण पेपर लीक होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. एनटीएच्या मते, काही ठिकाणी डमी उमेदवार बसवणे, काही केंद्रांवर गैरव्यवहार किंवा उत्तरपत्रिकांमध्ये फेरबदल झाल्याच्या तुरळक घटना घडल्या, ज्याला पेपरफुटी म्हणता येणार नाही.

नीट युजी परीक्षा २०२२६ च्या पेपरफुटीच्या वादावर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने संसदीय समितीसमोर एक महत्त्वपूर्ण आणि धक्कादायक दावा चक्रावून टाकणारा आहे.एनटीएच्या अधिकाऱ्यांनी संसदेच्या स्थायी समितीला सांगितले की, त्यांच्या यंत्रणेतून पेपर फुटलेला नाही. जोपर्यंत सीबीआय या प्रकरणात अधिकृत पुष्टी करत नाही, तोपर्यंत ते पेपरफुटी झाल्याचे मानणार नाहीत.

एन टी ए च्या अधिकाऱ्यांनी दावा केला की त्यांच्या सिस्टीममधून पेपर फुटलेला नाही.सीबीआय या प्रकरणाचा तपास करत आहे. सीबीआय जोपर्यंत स्पष्ट करत नाही, तोपर्यंत घडलेल्या प्रकाराला पेपर लीक मानले जाणार नाही, असा पवित्रा एन टी ए ने घेतला मग प्रश्न निर्माण होतो की जर पेपर फुटलाच नाही आणि अनियमितता झाली, तर परीक्षा रद्द का करण्यात आली? सोशल मीडियावर व्हायरल झालेले प्रश्नपत्रिका ही कुठून आली? यावर एन टी ए च्या अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही.

मग पेपरफुटीचे मूळ रहस्य काय?

नीट प्रकरणाच्या तपासात, पेपर एन टी ए या मुख्य सर्व्हरवरून किंवा सिस्टममधून अधिकृतरीत्या लीक झाला नसला तरी परीक्षा केंद्रावरून काही प्रश्न बाहेर काढून, हाताने लिहून व नंतर त्याची डिजिटल पीडीएफ तयार करून ती सोशल मीडियावर आणि टेलिग्रामवर व्हायरल करण्यात आल्याचे सीबीआय तपासात समोर आले आहे.

एनटीए आणि शिक्षण मंत्रालयाच्या मते, संपूर्ण पेपर कधीच टेलिग्राम किंवा सोशल मीडियावर लीक झाला नव्हता. मात्र, व्हायरल झालेल्या प्रश्नपत्रिकांविषयी खालील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत:प्रश्न बाहेर काढणे: परीक्षा घेणाऱ्या मध्यवर्ती यंत्रणेतील काही अधिकारी आणि परीक्षा केंद्रांवर नियुक्त केलेल्या विषयतज्ज्ञांनी (उदा. लातूर आणि पुण्याचे काही शिक्षक व संचालक) प्रश्नपत्रिकांमधून प्रश्न बाहेर काढले.हे प्रश्न हाताने लिहून, स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात बनवले गेले. परीक्षेपूर्वीच हे प्रश्न काही विशिष्ट कोचिंग क्लासेस आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले होते.राजस्थानात जप्त केलेल्या गेस पेपर मधील १०० हून अधिक प्रश्न थेट मूळ प्रश्नपत्रिकेशी जुळले होते. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच व्हायरल झालेली प्रश्नपत्रिका किंवा काही प्रश्न हे या गैरप्रकाराचाच एक भाग होते.

पेपर एन टी ए च्या यंत्रणेतून हॅक किंवा मोठ्या प्रमाणावर लीक झाला नसला, तरी अंतर्गत व्यक्तींच्या संगनमताने प्रश्न बाहेर काढून ते पैशांसाठी काही निवडक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले, ज्याच्यामुळे ही संपूर्ण परीक्षा वादात सापडली.यासंबंधीच्या तपासातील महत्त्वाचे धागेदोरेकेंद्रीय अन्वेषण विभागाने केलेल्या तपासात या पेपरफुटीचे मोठे महाराष्ट्र कनेक्शन समोर आले आहे. या रॅकेटचे जाळे लातूर, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत पसरलेले होते

सीबीआयने पुण्यातून पी. व्ही. कुलकर्णी, लातूरमधील रेणुका केमिस्ट्री क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर आणि इतरांना अटक केली आहे.आरोपींनी मिळून १३२ प्रश्न बाहेर काढले आणि प्रति विद्यार्थी २५ ते ३० लाख रुपये घेऊन प्रश्नपत्रिका आणि उत्तरे विकल्याचा आरोप आहे.

थोडक्यात, पेपर संपूर्णपणे बाजारात आला नसला तरी, संघटित गुन्हेगार, भ्रष्ट परीक्षा अधिकारी आणि दलालांच्या मदतीने परीक्षा सुरू होण्याआधीच विशिष्ट विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्न आणि उत्तरे पोहोचवली गेली, ज्याला सिस्टीममधील मोठी फसवणूक मानले जाते.

# श्री माणिकचंद सेठी यांच्या संघर्षमय जिवनाची "गौरव गाथा" या स्मरणिकेचे मा. श्री. राजेंद्र बाबुजी दर्डा यांच्याहस्ते विमोचन






**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – श्री माणिकचंद नारायणदास सेठी धोंडराईवाले यांच्या संघर्षमय जिवनाचा प्रवास दाखवणारी "गौरव गाथा" या स्मरणिकेचे मा. श्री. राजेंद्र बाबुजी दर्डा यांच्या शुभहस्ते विमोचन आज थाटात संपन्न झाले. यावेळी राजेंद्र दर्डा यांनी श्री माणिकचंद उर्फ भाऊसाहेब यांच्यासोबतच्या आठवणी सांगितल्या, त्यांनी अतिशय हालाक्याच्या परिस्थितीतून सर्व कुटुंब पुढे आणले व अतिशय चांगले संस्कार देऊन सर्व परिवार जोडून ठेवला ही खूप मोठी संपत्ती त्यांनी कमावली. आज एकत्र कुटुंब क्वचितच पहावयास मिळते. तुमचा हा एकत्र परिवार पाहून खूप अभिमान वाटतो, हे सर्व भाऊसाहेबांच्या संस्काराचे यश आहे असे ते म्हणाले.

याप्रसंगी या पुस्तकाचे लेखक डॉ तात्यासाहेब मेघारे यांनी भाऊसाहेबांसोबतच्या खूप आठवणी सांगितल्या त्यांचे समाजकार्य खूप जवळून बघितल्याचे त्यांनी सांगितले. मी त्यांच्यासोबत तीस वर्षे काम केले म्हणून मला त्यांचा हा जीवनप्रवास शब्दांच्या रूपात मांडता आला व त्यासाठी त्यांच्या संपूर्ण परिवाराने मला खूप मदत केल्याचे सांगितले.

त्यांच्या या जीवन प्रवासावर स्मरणिका काढण्याचे श्री महावीर सेठी यांनी ठरविले व भाऊसाहेबांच्या दुसऱ्या स्मृतिदिनी म्हणजेच २२ मे रोजी या स्मरणीकेचे विमोचन अत्यंत साध्या पद्धतीने राजेंद्र बाबूजी दरड यांच्या हस्ते केले यावेळी त्यांनी भाऊसाहेबांचे कार्य थोडक्यात सांगितले संपूर्ण गावातील कास्तकरी त्यांना देवाप्रमाणे मानत असे त्यांनी सांगितले. भाऊसाहेबांनी अत्यंत कठीण परिस्थितीत खूप कष्टाने संपूर्ण गावकऱ्यांच्या साथीने खूप चांगले कार्य केले त्यांचा हा प्रवास नवीन पिढीतील तरुण वर्ग खूप मार्गदर्शक ठरेल असे त्यांनी सांगितले या कार्यक्रमास भाऊ साहेबांचे निकटवर्तीय व परिवारातील अनेक सदस्य उपस्थित होते या गौरवगाथेचे प्रकाशन पुण्याच्या ज्योतिर्मय प्रकाशन यांनी अतिशय कमी वेळेत व खूपच आकर्षक रित्या केले त्याबद्दल ज्योतिरमय प्रकाशाचे श्री संजय व्यापारी यांचे त्यांनी आभार मानले व त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास नमिता बोहरा, कल्पना सेठी, मीना सेठी, संगीता सेठी, राजेंद्र सेठी, प्रकाश सेठी, महावीर सेठी, तात्यासाहेब मेघारे, संजय व्यापारी, निखिल सेठी, कृतिका सेठी, विनय सेठी, अदिती सेठी, शैलेश चांदीवाल, बीड व गेवराई येथून या विमोचन सोहळ्यास आलेले धोडराई गावाच्या सरपंच शीतल साखरे, नवनाथ साखरे व सिध्देश्वर कदम मान्यत आदि मान्यवर उपस्थित होते. अनेक मान्यवर आले होते.

# कॉकरोच जनता पार्टी : तरुणांचा उद्रेक की... राजकीय प्रयोग?

डिजिटल वर्तुळात सध्या 'कॉकरोच जनता पार्टी'ची जोरदार चर्चा आहे. वरकरणी हा सामान्य आणि बेरोजगार युवकांचा आक्रोश वाटत असला, तरी या चळवळीच्या रचनेमागे सोशल मीडिया मानसशास्त्र आणि राजकीय प्रचाराचा मोठा अनुभव असलेल्या व्यक्तीचा हात असल्याचे समोर येत आहे. आगामी काळातील आंदोलनांची पार्श्वभूमी आणि मराठवाड्याचे राजकीय वातावरण पाहता, तरुणांनी या लाटेत वाहून जाण्यापूर्वी सत्य काय हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यावर प्रकाश टाकणारा हा स्वतंत्र लेख...

**– अमोल कृष्णराव टेंभुर्णे,** पुणे

**ज्योतिर्मय साहित्य**

"कॉक्रोच जनता पार्टी" ही फक्त बेरोजगार तरुणांची अचानक उभी राहिलेली चळवळ आहे, असा समज अनेक जण करून घेत आहेत. पण उपलब्ध माहिती पाहिली तर ही चळवळ पूर्णपणे "सामान्य युवकांची स्वयंस्फूर्त लाट" नसून, एका अनुभवी राजकीय सोशल मीडिया कार्यकर्त्याने उभारलेला डिजिटल प्रयोग असल्याचे दिसते.

या चळवळीचे संस्थापक अभिजित दीपके हे पूर्वी च्या सोशल मीडिया टीमशी जोडलेले होते आणि त्यांनी निवडणुकांमध्ये डिजिटल प्रचार, मीम कॅम्पेन आणि युवकांपर्यंत पोहोचणाऱ्या राजकीय मोहिमांवर काम केले होते. अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये त्यांचा शी संबंध स्पष्टपणे नमूद करण्यात आला आहे. म्हणजेच ही काही "अचानक पेटलेली सामान्य बेरोजगार तरुणांची चळवळ" नसून, सोशल मीडिया मानसशास्त्र आणि राजकीय प्रचार यांचा अनुभव असलेल्या व्यक्तीने उभारलेली मोहीम असल्याचा प्रश्न उपस्थित होतो.




**अमोल कृष्णराव टेंभुर्णे, पुणे**

(लेखक युवकांविषयीच्या घडामोडीचे अभ्यासक आहेत.)

यामध्ये आणखी एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे संभाजीनगर आणि मराठवाडा. इतिहास पाहिला तर मराठवाडा हा आंदोलनांचा आणि भावनिक प्रश्नांवर पटकन पेट घेणारा भाग राहिला आहे. आरक्षण, नामांतर, पाणी, बेरोजगारी किंवा सामाजिक असंतोष अशा मुद्द्यांवर येथे वारंवार मोठ्या चळवळी उभ्या राहिल्या आहेत.सध्या आरक्षण हा मुद्दा ज्वलंत आहे आणि येत्या काळात पुन्हा त्यासाठी उपोषण आणि आंदोलन होणार अशा आशयाच्या बातम्या प्रसारित होत आहे.त्यामुळे काही जणांच्या मते, अशा प्रदेशातूनच डिजिटल आंदोलनाचा चेहरा पुढे येणे हे योगायोग नसू शकते.

सध्या महाराष्ट्रात बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, शेतकरी प्रश्न आणि प्रादेशिक असंतोष यावर वातावरण तापलेले आहे. अशा वेळी सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारविरोधी भावना एकत्र करून पुन्हा मोठी चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सुरू आहे का, हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होत आहे.

तथापि, हे सर्व विश्लेषण एक राजकीय निरीक्षण आहे. याबाबत कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नाही की ही चळवळ एखाद्या विशिष्ट पक्षाच्या थेट नियंत्रणाखालीच चालते. पण संस्थापकाची राजकीय पार्श्वभूमी आणि चळवळीची डिजिटल रचना पाहता, याकडे केवळ "सामान्य युवकांचा उद्रेक" म्हणून पाहणेही तितकेच अपूर्ण ठरू शकते. त्यामुळे कुठल्याही चळवळीला पाठिंबा देण्याअगोदर आपला सदसद्विवेक वापरावा.


## मराठीतील साहित्यावर चालणारे एकमेव ई दैनिक

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

नवोदित साहित्यिकांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून अल्पावधित लाखों वाचकांचे मने जिंकणारे,

प्रत्येकाला आपले वाटते असे एक आकर्षक ई दैनिक. साहित्यावर आधारित बित्तंबातमी, लेख, लघुकथा, दीर्घकथा, कविता, पुस्तक परीक्षण, नाट्य, कला, शिक्षण, संस्कृतीचा वेध, अध्यात्म, कृषि, पर्यटन, बाल साहित्यापासून आयुर्वेदापर्यंत ज्ञान - विज्ञान - मनोरंजन सर्वकाही उपलब्ध.

- सर्व प्रकारच्या जाहिरातीसाठी फक्त 100 रुपये एका दिवसासाठी.
- साहित्य प्रकाशित करण्यासाठी वार्षिक वर्गणी वयक्तिक फक्त 500 रुपये व संस्थेसाठी फक्त 1000 रुपये.
- पेपर वाचण्यासाठी टाईप करा - www.jyotirmaysahitya.com
- ऑनलाईन पेमेंटसाठी - 7743918559

## जात्यावरच्या ओव्या......



काय सांगू महती
वाडा दगडी चौकाचा
माग पाहे,पुढ चाले
फेटा पडला लोकाचा ||६५५||

काय सांगू महती
बारव रांजणा वाणी
थंड पाण्याला म्हणले
तुम्ही अमृताचे धनी ||६५६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३३

ज्योतिर्मय साहित्य

**वसे मेरूमांदार हे सृष्टिलीळा।**
**शशी सूर्य तारांगणे मेघमाला।**
**चिरंजीव केले जनी दास दोन्ही ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।३३।**

अर्थ : ही सृष्टी म्हणजे भगवंताची लीला आहे. त्यासृष्टीत मेरूमांदार आदी पर्वत आहेत. चंद्र, सूर्य आणि तारांगणे आहेत. मेघमाला आहेत. ही सृष्टी आहे तोपर्यंत हनुमान आणि बिभीषण दोन्ही चिरंजीव आहेत. प्रभू रामचंद्रांनी आपल्या या दोन्ही दासांना चिरंजीव केले आहे. दासाभिमानी असलेला भगवंत आपल्या भक्तांची कधीही उपेक्षा करीत नाही.


(मेरू - स्वर्ग, मत्यू, पाताळ यांना आधारभूत असलेला सोन्याचा पर्वत. मांदार - समुद्रमंथनाचे वेळी या पर्वताचा रवी म्हणून वापर केला गेला)

विवेचन : समर्थांनी आपल्याला मागील श्लोकात भगवंताच्या पराक्रमाचे आणि गुणांचे वर्णन करून सांगितले आहे या श्लोकात ते आपल्याला सांगतात की आपल्याला ही जी सृष्टी दिसते आहे ती म्हणजे केवळ भगवंताची लीला मात्र आहे. मेरू आणि मांदार हे दोन्ही पर्वत, चंद्र, सूर्य, अगणित तारे आणि तारका, असंख्य अशा आकाशमाला, बरसणारे ढग या सगळ्या गोष्टी परमेश्वराने निर्माण केल्या आहेत.



मेरू पर्वत, ज्याला सुमेरू असेही म्हटले जाते, एक पौराणिक पर्वत असून हिमालयात स्थित आहे असे मानले जाते. हा पर्वत म्हणजे हिंदू, जैन आणि बौद्ध धर्मांचे एक पवित्र स्थान समजले जाते. त्याचप्रमाणे हा पृथ्वीच्या उत्तर ध्रुवावर स्थित असून पृथ्वीची नाभी समजला जातो. हा पर्वत सुवर्णप्रमाणे चमकतो.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

मांदार पर्वताचा उल्लेख देखील पौराणिक कथांमध्ये येतो. हा पर्वत बिहारच्या बांका जिल्ह्यात असून त्याची उंची सुमारे ७०० फूट आहे. पौराणिक कथेनुसार, समुद्रमंथनादरम्यान देव-दानवांनी अमृत मिळवण्यासाठी वासुकी नागासह या पर्वताला रवीसारखे वापरले होते। हे हिंदू आणि जैन धर्मातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र मानले जाते. या अद्भुत पर्वतांसारख्या अनेक अद्भुत आणि आश्चर्यकारक गोष्टी परमेश्वराने निर्माण केल्या आहेत.

थोडक्यात सांगायचे तर आपल्याला दिसणाऱ्या या अवघ्या विश्वाचा निर्माता भगवंत आहे. या सृष्टीमध्ये सजीवांसाठी आवश्यक असलेल्या हवा, पाणी, अन्न यासारख्या गोष्टी त्यानेच निर्माण केल्या आहेत. त्याची निर्मिती असलेले चंद्र आणि सूर्य आपल्याला प्रकाश देतात. नद्या आपली तहान भागवतात. मेघातून बरसणारा पाऊस आपल्यासाठी अन्न निर्माण करतो. या सगळ्या गोष्टी म्हणजे त्या परमेश्वराचीच निर्मिती आहेत. **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||


@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ यश

यश हे केलेल्या कार्याचा आनंद घेण्यात असते त्यासाठी प्रत्येक लढाई जिंकलीच पाहिजे असे नसते. कामं व्यवस्थित करणे हेच यशाचे प्रतीक आहे.

## अखंड समाधानाचा मार्ग : नामस्मरण: वृद्धांना उपदेश



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ।। स्वार्थरहित रामसेवा । याहून दुजा लाभ न जीवा ।। वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंतसेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण रहावे रामार्पण । याहून अन्य सेवा । कोणतीही नाही जाण ।। जे जे दिसते ते ते नासते । हा बोध घेऊनि चित्ती । सज्जन लोक जगी वर्तती । तैसे तुम्ही आता वागा जगात ।। मुलां-बाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात उदास न व्हावे ।। प्रपंचाची उपाधि । आता मनात न आणावी ।। उपाधिवेगळे झाला । ऐसे ऐकू द्यावे मला ।। उपाधीत राहिला । परि चित्ताला न वास दिला । ऐसे ठेवा मनी । राम आणावा ध्यानीं । आता यापरतें हित । नाहीं दुसरे जगांत । हा माझा बोल । न मानावा फोल ।। आता रामा तुझा झालो । कर्तेपणातून मुक्त झालों । ऐसें आणावे मनांत । शक्य तितके राहावे नामात । याहून दुसरें न आणावे मनांत ।। लौकिकांतील मानापमान । यांचे सोडावें उदक । ध्यानीं आणावा रघुनंदन एक ।। बायको-मुलांबाळांत राहावे । चित्त रामाकडे ठेवावें । होईल तेवढे नाम घ्यावें ।। अंतरी परमात्मा त्यास । ठेवून साक्ष भावे भजावे रघुनाथास । न सोडावा मनाचा धीर । मागे आहे रघुवीर ।।

वृद्धपण आलें । शरीर क्षीण झालें । तरी आपण अभिमान घेऊनच राहिले । त्यास सोडावें दूर । प्रपंचांत वृद्धपणीं न पाहावें । मुलांस मार्ग दाखवून सुखी राहावें । औषध पथ्यपाणी सांभाळावें । पण दु:खी कष्टी कधीं न व्हावें ।। शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति क्षीण नाही बनली ।। जोवर देहाची संगति । तोवर 'मी-माझें' ही वृत्ति ।। आता वृत्ति राखावी रामापाशी । दुजी उठू न द्यावी त्यापरती ।। आजवर जें घडलें । ते प्रापंचिक, पारमार्थिक असो भले । तें रामकृपेने झाले । हे ठेवावे चित्तीं । आता न सोडावा रघुपति ।। वयोमानानें शरीर होतें क्षीण । वागणें आहे फार जपून ।। देह आळशी न ठेवावा हे जरी खरें । तरी त्याची परिस्थिति ओळखून राहणे हे बरे ।। आता आपण झालो शरीराचे अधीन । हे वयोमानानें दृश्य भासत । तरी भाव ठेवा रामापायीं । ज्याला क्षीणता कधीं आली नाहीं ।। चित्तीं राखावें समाधान । आनंदानें संसार करावा जाण ।। समाधानाचें करावे जतन । ते नसावें कशावर अवलंबून ।। लाभहानींत न गुंतवता मन । राखता येईल समाधान ।। समाधानाला अडवणूक जाण । माझा मीच आपण ।। देहाचे भोग ठेवावे देहाचे माथीं । समाधानांत राखावी वृत्ति ।। सर्व कर्ता राम हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजींचे उरलें नाहीं काम । हे सर्व जुळतें म्हणतां राम राम ।। तरी सर्वांनीं घ्यावे रामनाम । व्हावें परमात्म्याचे आपण । कृपा करील रघुवीर ।।

मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधीं न राही ।।

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

आपण धार्मिक ग्रंथाचे अवलोकन करीत असताना आपणास असे लक्षात येते की प्रचंड ग्रंथसंपदा अध्यात्म या विषयावर निर्मीत झालेली आहे. केवळ वेद ग्रंथ पूर्वी 5,108 इतके होते. याशिवाय श्रुती, अरण्यके, ब्राह्मणे अशी संख्या हजारोंच्या घरात आहे. यातील सर्वच ग्रंथ अत्यंत मौलिक आणि विज्ञाननिष्ठ ज्ञान देत असून कोणताही ग्रंथ वाऊगा विचार मांडत नाहीत. या हजारो वेद ग्रंथाच्या शिवाय अठरा पुराणे व्यासांनी निर्मित केलेली आहेत. याशिवाय उपनिषदे अनेक आहेत. भगवद्गीता त्यावर झालेल्या टीका शेकड्याने उपलब्ध आहेत. रामायण हा ग्रंथ 200 कवींनी वेगवेगळ्या रूपात मांडला आहे. महाभारत हा प्रचंड मोठा ग्रंथ उपलब्ध आहे. आता हा प्रश्न पडतो की, इतके हजारो ग्रंथ उपलब्ध असताना, आणि हे सर्व अध्यात्माचाच विषय प्रतिपादन करीत असताना भगवद्गीते वरच्या एका वेगळ्या टिकेला ज्याला आपण भावार्थ दीपिका किंवा ज्ञानेश्वरी असे म्हणतो हा ज्ञानेश्वरी ग्रंथ ज्ञानेश्वरांनी निर्मित करण्यामागील प्रयोजन काय असावे ?

ज्यावेळेस ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निर्मित झाला त्यावेळेस संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे आजच्या कायद्याच्या भाषेत अज्ञान बालक होते. कारण त्यावेळेस त्यांचे वय केवळ पंधरा-सोळा वर्षाचे होते. केवळ प्रसिद्धी मिळावी आपला मान मरातब वाढावा ही भावना तर निश्चित स्वरूपात या बालकात नव्हती. मग ज्ञानेश्वरी हा ग्रंथ का निर्मित करावा लागला?

क्रमश:.......

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "शिक्षण क्षेत्रातील नैतिकता आणि पावित्र्य"नीट"जपावे!

क्षेत्र कोणतेही असो गोड शब्दवाणी आणि नेक व स्वच्छ व्यवहारच माणसाला मोठे बनवितो. पैसा, धन किंवा दौलतीने मणुष्य संस्था मोठ्याहोत नाही!खाजगी असो की सरकारी हा नियम आहे. खरा सेवक महात्मा तर तो आहे, ज्याजवल चांगले विचार मधुर व्यवहार व सर्व सामान्याविषयी आस्था आहे. शिक्षण व संस्काराने बदल होतो. मोठ्याचा आदर नात्याचे सौदर्य, माणूसकी जीवनमुल्ये यांचे शिक्षण देणार्या शाळा विद्यामंदिरे होतील, हेच कार्य गुरूजीचे.
पुर्वीचे गुरुकुल ते आताच्या शाळाविद्यालयातून हीच ईच्छा अपेक्षा पूर्ण व्हावी. पण आता त्याला तडे जात आहे.
"आजचे शिक्षण सम्राट ते पुर्वीचे शिक्षण महर्षी. उदा. महर्षि धोंडो केशव कर्वे. किती शौर्य धैर्य व सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली! आधी केले मग सांगीतले. यासाठी प्रथम एका विधवेशी विवाह केला. म्हणून ते भारतरत्न झाले. तसेच रविद्रनाथ टागोर, साने गुरुजी यांच्या कार्याची दखल घेतली गेली. दुसरी आजची बातमी. "तेलंगणच्या सरकारी शाळेत
नागरत्नम यांनी 17 मुलापासून 72 मुलापर्यंत शर्यत वाढविली ती स्वतःच्या कष्टाने, प्रयत्नाने
आणि गावकर्याच्या सहकार्याने.. तर आज एवढे
'शिक्षण पुराण' पूरे. तुर्त थांबतो. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत चला. गूड डे गुड मार्निंग.

## आरोग्य संजीवनी



## घशातील जंतुसंसर्ग

ज्योतिर्मय साहित्य

थ्रोट इन्फेक्शन

घशाचा दाह किंवा घशात खवखवणे ह्या आजाराला शास्त्रीय भाषेत फॅरेनजायटिस असे म्हणतात. म्हणजे जंतू दोष अथवा जंतुसंसर्ग होय हे सर्दी किंवा फ्लू प्रमाणेच घशाला होणारे एक व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते.

घसा दुखणे किंवा खवखवणे, बोलताना किंवा गिळताना घसा दुखणे, गिळायला त्रास होणे, टॉन्सिल्सला सूज येऊन ते लाल होणे, टॉन्सिल्सवर पांढरे चट्टे उठणे किंवा त्यावर पस तयार होणे ही फॅरिन्जायटिसची कॉमन लक्षणे आहेत. घशाला हा त्रास होत असताना शरीर सुद्धा ह्या इन्फेक्शनची ताप, खोकला, नाक सतत वाहणे, अंगदुखी, डोकेदुखी, शिंका, मळमळ किंवा उलटी होणे ही लक्षणे दाखवत असते. मोठी माणसे हे सगळे काही प्रमाणात सहन करू शकतात. पण लहान मुलांना श्वास घेण्यास त्रास होतो. तसेच गिळताना त्रास होतो आणि त्यामुळे सतत तोंडातून लाळ गळत असते. असे झाल्यास त्यांना त्वरित डॉक्टरांकडे नेणे आवश्यक आहे.

उपाययोजना

१) घशाची सूज उतरण्यासाठी आपल्याला गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करा. २) सुंठ, गवती चहा, ज्येष्ठमध, हळद, पुदिना यांचा चहा करा लिंबू पिळून प्या.

३) घशाला झालेले इन्फेक्शन घालवण्यासाठी पेरूचे पान अत्यंत उपयुक्त आहे. पेरूच्या पानात आयुर्वेदिक गुणधर्म आहेत. ते चाऊन अथवा उकळून रस प्या. ४) थंडीमध्ये घशाचे इन्फेक्शन होणे ही अतिशय सामान्य समस्या आहे. याच्या जोडीला येणारा ताप, सर्दी यामुळे आपण हैराण होऊन जातो. पण वाफ घेणे हा यारील सोपा उपाय आहे. घरच्या घरी गरम पाणी करुन त्याची वाफ घेतल्यास घशाला आराम पडतो. दिवसातून दोन ते ती वेळा हे केल्यास इन्फेक्शन कमी व्हायला मदत होते. ५) घसा दुखत असल्यास काहीतरी गरम पिण्याची इच्छा होते. अशावेळी गरम काढा प्यायल्यास त्याचा निश्चित फायदा होतो. काढा मध्ये तुळस, लवंग, आले घातल्यास घशासाठी तो जास्त उपयुक्त होतो. असा काढा दिवसातून २ वेळा घेतला तरी घशाला आराम मिळतो. ६) दोन मिर्याची पुड किंचित हळद, किंचीत काथाची पुड मधात घ्यावी. ७) काथाची फुड गरम पाण्यात घेतल्यास घसा सुटतो. ८) गरम पाण्यात एक लिंबू रस घ्यावा ९) लसणाची पाकळी पिठी साखरेत घालून खायची. १०) मध व जेष्ठीमध पावडर, व हळद, कोरफडीचा गर आवाजा साठी एकत्र करून चाटावा. दोन वेळा. ११) घसा दुखत असल्यास आल्याचा तुकडा तोंडात ठेऊन चावा. त्यामुळे तुम्हाला लवकरआराम मिळेल. १२) आल्याचे चार तुकडे, दोन टोमॅटो, मध यांचा रस करुन प्या.

१३) पाण्यात कांदा टाकून उकळा व गाळून त्यात कोमट झाल्यावर मध टाकून ते पाणी थोडयाथोड्या वेळाने प्या. १४) मधात काही लवंगा टाका. काही तासांनी लवंगा काढून त्याचे चाटण खा. लवंगामुळे वेदना कमी होतील व मधाने घशाला आराम मिळेल. (१५) पाण्यात बडीसोप टाकून ते काही मिनीटे उकळा त्यानंतर पाणी गाळून घ्या व त्यात मध टाकून थोड्या थोड्या वेळाने प्या. १६) लिंबाचा रस व एक चमचा मध टाकलेले कोमट पाणी प्या. १७) पुरेसा आराम करा. व्यवस्थित आराम केल्यामुळे शरीर इनफेक्शनला प्रतिकार करु शकते.

**(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**रंग जीवनाचे**

क्षण असे छान
सुंदर,सोनेरी खरे
आहेत रंग जीवनाचे
सु:ख-दु:खासह पहा
जीवन हे सजलेले
ओठी हास्य आनंदाचे

रंगीबेरंगी फुलांचा जणू
सुगंध चौफेर दरवळताना
सजलेले रंग जीवनाचे
नाती जपताना पहा
खंबीरपणे उभे पाठीशी
प्रेमासह छान सोबतीचे

# पेरणीतून उभी राहिली मानवी संस्कृती- प्रा. इंद्रजीत भालेराव

## 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६'मध्ये 'शोध कृषी संस्कृतीचा' विषयावर व्याख्यान उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

वाशिम - माणसाने प्राण्यांची शिकार करून खाण्याऐवजी पेरून खाण्याची सुरुवात केली, तिथूनच खऱ्या अर्थाने मानवी संस्कृती आणि शेती संस्कृतीचा उदय झाला, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी, साहित्यिक व विचारवंत प्रा. इंद्रजीत भालेराव यांनी केले. वाशिम जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी वृंदातर्फे आयोजित 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६' अंतर्गत दुसऱ्या पुष्पाचे व्याख्यान गुरुवारी दि. २२ मे रोजी उत्साहात पार पडले.

स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री ना.चं. कांबळे, बाबाराव मुसळे यांच्यासह

अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) संजय रणवीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी एस ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.




'शोध कृषी संस्कृतीचा' या विषयावर बोलताना प्रा. भालेराव यांनी प्राचीन लोकपरंपरा, वेदकालीन संस्कृती, रामायण-महाभारतकालीन कृषी व्यवस्था तसेच संत साहित्य आणि कृषीविषयक ग्रंथांच्या आधारे शेती संस्कृतीचा समृद्ध इतिहास उलगडून सांगितला.

व्याख्यानादरम्यान त्यांनी पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारांचा संदर्भ देत शेतीच्या प्रारंभाचा इतिहास स्पष्ट केला. त्रिशूलाचे तिफणीत झालेले रूपांतर, बसव्या बैलाची लोकपरंपरा आणि शेतीसाठी पशूंचा उपयोग याविषयी त्यांनी रंजक माहिती दिली. तसेच कॉ. शरद पाटील यांच्या 'वेदातील शेतीचा शोध' या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी 'तंत्र' म्हणजे शेती आणि 'वेद' म्हणजे ज्ञान यांचा संबंध अधोरेखित केला.

प्राचीन काळातील सामूहिक शेती, 'सीता' म्हणजे न नांगरलेली जमीन आणि 'उर्वरा' म्हणजे नांगरलेली जमीन या शेती प्रकारांची माहिती देतानाच 'वाफ धावण' या कृषीपरंपरेचाही त्यांनी उल्लेख केला. महाभारतकालीन कृषी व्यवस्थेचा संदर्भ देताना शेतकरी वर्गासाठी असलेली कर्जव्यवस्था, करपद्धती आणि शेतीचे विविध प्रकार यांचे विवेचन त्यांनी केले. देव मातृक, नदी मातृक आणि प्रकृती मातृक अशा शेतीच्या प्रकारांचेही त्यांनी सविस्तर वर्णन केले.

कृषी पराशर आणि कश्यप ऋषींच्या ग्रंथांतील संदर्भ देत त्यांनी जलव्यवस्थापन, संतुलित आहार आणि शेतीतील वैज्ञानिक दृष्टिकोन यावर प्रकाश टाकला. दक्षिण भारतातील संत तिरुवल्लुवर यांच्या 'कुराळ' या ग्रंथाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले, तर जगाला जगणे अवघड होईल, हा संदेश आजही अत्यंत समर्पक आहे. साने गुरुजी यांनी या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केल्याची माहितीही त्यांनी दिली.

पशुसंवर्धन, गोवंश व्यवस्थापन, बौद्धकालीन शेती, सम्राट अशोकाच्या काळातील सिंचन व्यवस्था आणि 'हलोत्सव' या कृषी उत्सवाबाबतही त्यांनी माहिती दिली. तसेच 'गाथासप्तशती', ज्ञानेश्वरी, संत एकनाथांचे भागवत आणि संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांमधून व्यक्त झालेल्या शेती संस्कृतीचे प्रभावी संदर्भ त्यांनी श्रोत्यांसमोर मांडले.

प्रा. भालेराव यांच्या अभ्यासपूर्ण, ओघवत्या आणि प्रभावी शैलीतील व्याख्यानाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, शेतकरी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट

तुमच्या पैशांचे व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया, ज्यामध्ये १.उत्पन्न,२. खर्च, ३.बचत, ४.इनव्हेस्टमेंट आणि ५.इन्शुरन्स या पाच स्तंभांचा समावेश होतो. यामध्ये एखादी व्यक्ती किंवा कुटुंब जीवनात पुढे जाताना, वैयक्तिक ध्येये साध्य करण्यासाठी आणि स्थिर सुरक्षित भविष्यासाठी घेत असलेले सर्व आर्थिक निर्णय समाविष्ट आहेत
मुळात, पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट म्हणजे तुमची आर्थिक संसाधने तुमच्या जीवनातील ध्येयांशी जुळवून घेणे—मग ते घर खरेदी करणे असो, उच्च शिक्षणासाठी निधी उभारणे असो, व्यवसायासाठी अथवा व्यवसाय वाढीसाठी भांडवल जमवणे असो किंवा रीटायरमेंट प्लानिंग करणे असो.
पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट का महत्त्वाचे आहे.
प्रभावी पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट म्हणजे केवळ संपत्ती जमा करणे नव्हे,तर ते आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे फायनँशीयल फ्रिडम आणि मन:शांती मिळवणे आहे.
योग्य पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट तुम्हाला खालील गोष्टींमध्ये मदत करते:
आर्थिक ताण कमी करणे: प्रत्येक रुपया कुठे जातो हे माहीत असल्यामुळे, पगारावर अवलंबून राहण्याची चिंता दूर होते. क्रमश:.........

# वडसात रंगणार झाडी रंगभूमीवरील तेजस्विनीचा गौरव सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

वडसा - महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने पूर्व विदर्भातील झाडीपट्टी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविणाऱ्या निवडक स्त्री कलावंतांचा सत्कार सोहळा वडसा येथे होणार आहे. महिला कलावंतांच्या सत्कार सोहळ्याच्या आयोजनाबाबत नियोजन बैठक नुकतीच संपन्न झाली. लवकरच सात जूनला आयोजित करण्यात येणाऱ्या या सत्कार सोहळ्यात नृत्य, नाट्य, संगीत, कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला कलावंतांचा सन्मान करण्यात येणार आहे. महिला कलावंतांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कलागुणांचे समाजासमोर गौरव करणे हा उद्देश असल्याचे आयोजक राधेश्याम बरय्या यांनी सांगितले.

महिला कलावंतांच्या कला, संस्कृती व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या ''महिला कलावंत सत्कार सोहळ्याचे भव्य आयोजन देसाईगंज वडसा येथील नगरपरिषदेच्या सभागृहात करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्यासाठी माजी मंत्री डॉ.आ. धर्मरावबाबा आत्राम, गडचिरोली जिल्ह्याचे सह पालकमंत्री मा.आशिष जयस्वाल, भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यासह नाट्य क्षेत्रातील दिग्गज मान्यवराच्या प्रमुख उपस्थितीत रंगभूमीवर कार्य करणाऱ्या महिला कलावंतांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सचिव राधेश्याम बरय्या यांनी दिली.

# प्रा. गोविंद ढगे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर - प्रा. गोविंद एस. ढगे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने, मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी ''एक्सपेरिमेंटल अँड मॉडलिंग स्टडीज ऑफ सरफेस कॅरेक्टरस्टिक ऑफ फिनिश हॉबेड गिअर'' या विषयावर संशोधन पूर्ण केले असून, हे संशोधन मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील नाविन्यपूर्ण विकासावर आधारित आहे.

डॉ. आर. एस. पवार, प्राचार्य, वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बावधन, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. या संशोधनाची व्यावहारिक उपयुक्तता आणि शैक्षणिक दर्जा याबद्दल विशेष प्रशंसा करण्यात येत असून, आधुनिक अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध आव्हानांवर उपाय सुचविणारे हे संशोधन मानले जात आहे. डॉ. गोविंद ढगे हे सध्या भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्था संचलित हायटेक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बजाजनगर, वाळूज येथे कार्यरत आहेत.

या यशाबद्दल बोलताना डॉ. गोविंद एस. ढगे यांनी विद्यापीठ, संशोधन मार्गदर्शक तसेच सहकाऱ्यांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि प्रोत्साहनाबद्दल आभार व्यक्त केले. त्यांच्या या यशाबद्दल भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे सचिव मा. श्री. एकनाथ जाधव साहेब व संस्थेचे सहसचिव मा. श्री. अमन जाधव साहेब, सहकारी आणि मित्रपरिवाराने अभिनंदन करून ही कामगिरी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगितले.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# उपेक्षित उर्मिला
## त्याग की मूक प्रतिमूर्ति

लेखिका - डॉ. मीना श्रीवास्तव





नमस्कार पाठक गण!

मैथिलीशरण गुप्त द्वारा रचित 'साकेत' (नवम सर्ग) में लक्ष्मण-प्रिया उर्मिला के विरह और समर्पण को दर्शानेवाला सुंदर और मार्मिक छंद उसके त्याग को परिभाषित करता है:


"मानस-मन्दिर में सती, पति की प्रतिमा थाप।
जलती-सी उस विरह में, बनी आरती आप॥
आँखों में प्रिय-मूर्ति थी, भूले थे सब भोग।
हुआ योग से भी अधिक, उसका
विषम-वियोग॥"

आपको स्मरण होगा कि मैंने पौराणिक कथावस्तु के अंतर्गत पंचकन्याओं के बारे में लेख लिखे। मेरा सौभाग्य है कि उन्हें काफी सराहा गया| उसीसे प्रोत्साहित होकर मैंने अन्य पौराणिक स्त्री पात्रों के बारे में लिखने के बारे में सोचा | हमारे देवतुल्य रामायण ग्रन्थ से आज मैंने एक व्यक्तिरेखा चुनी है| उसे सीता की परछाई मात्र समझ कर काफी हद तक उपेक्षित किया गया है |

वाल्मीकि रामायण में एक महत्वपूर्ण योगदान देनेवाली लक्ष्मण-पत्नी उर्मिला उसी शीतल चन्द्रमा के समान है जो सूर्य की भांति दमकती सीता की आभा में खो जाती है | हम अक्सर देखते हैं कि, नाटकों और फिल्मों में नायिका की सखी सदैव पार्श्वभूमि में रहकर नायिका का चरित्र उभारने में मदद करती है| उन्हें छोड़िये, कई घरों में कनिष्ठ कन्या हमेशा नम्बर दो पर ही रहती है| सच में देखें तो उर्मिला सीता से सुंदरता, सद्गुण, पातिव्रत्य, त्याग, समर्पण, प्रेम और महानता जैसे किसी भी गुण विशेष में कम नहीं थी! फिर भी उर्मिला और उपेक्षा इन दो शब्दों की सांठ-गांठ मानों उसकी तक़दीर का ही हिस्सा थे| उन्हें सुलझाने का प्रयत्न तक नहीं किया गया| प्रारम्भ परम पूजनीय रामायण के मूल रचयिता महाकवि वाल्मिकी द्वारा किया गया|

राजा जनक एवं रानी सुनयना की प्रथम औरस कन्या उर्मिला शेषनाग की पत्नी नागलक्ष्मी (माता लक्ष्मी का एक रूप) का अवतार मानी जाती हैं। परन्तु उनका अधिक लाड प्यार मिला गुणवती सीता को| यह तो सत्य है कि, राजा जनक ने सीता और उर्मिला पर उचित रूप से संस्कार किये| इतना ही नहीं, उनके छोटे भाई राजा कुशध्वज और उसकी पत्नी रानी चंद्रभागा की दो कन्याओं अर्थात, मांडवी एवं श्रुतकीर्ती का भी उन्होंने ही बड़े प्रेम से पालन पोषण किया |
क्रमश:........

# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास



विश्वास देशपांडे, चाळीसगाव. 94037 49932

भाग - 2



आज आमच्या प्रवासाचा तिसरा दिवस होता. सकाळी लवकरच जाग आली. पक्ष्यांचे कूजन सुरु होते. भीमताल येथील ही दुसरी आल्हाददायक पहाट आम्ही पाहत होतो. लवकरच आम्हाला सगळे आवरून चेक आउट करायचे होते आणि पुढील प्रवासासाठी निघायचे होते. भीमतालचे हे सौंदर्य, समोरचे रम्य भीमतालचे तळे, त्यातील आरसपानी पाण्यात पडलेले भोवतालच्या झाडांचे प्रतिबिंब, डोंगरातून वर येणारा सूर्य असे सकाळचे नयनरम्य दृश्य नेत्रात साठवून घेत होतो. पुन्हा इथे यायला मिळणार नव्हते. जमेल तेवढे फोटो घेतले. कधी कधी खूप फोटो घेण्यापेक्षा जे समोर दिसते आहे ते हृदयात साठवून घेणे महत्वाचे वाटते. ते तर करीतच होतो. आपला डोळा हा असा एक सुरेख कॅमेरा आहे की ज्याची बरोबरी कोणत्याच कॅमेऱ्याने होणार नाही. नजर जाईल तिथपर्यंतच दृश्य हा कॅमेरा सदैव जसंच्या तसं टिपत असतो. या कॅमेऱ्यात रोल सदैव टाकलेलाच असतो. त्याला ना बॅटरीची गरज असते, ना चार्जिंगची ! तुमचं मन फ्रेश असलं तर समोरचं दृश्य तुम्हाला फ्रेश वाटतं. आपलं मन किंवा हृदय ही अशी एक जागा आहे की जिथलं स्टोरेज कधी फुल्ल होत नाही. लहानपणीपासूनचा आठवणींचा चित्रपट हवा तेव्हा उलगडत जातो.

मनसोक्त नाश्ता आटोपून आम्ही बसमध्ये बसलो. आज आम्ही कौसानी या निसर्गरम्य ठिकाणी जाणार होतो. हा प्रवास साधारणपणे १३५ ते १४० किमीचा होता. पण डोंगरातील रस्त्यांचा विचार करता या प्रवासासाठी आम्हाला पाच ते सहा तास प्रवास करण्याची तयारी ठेवावी लागणार होती. पण डोंगरातील हा प्रवास तसा जाणवत नाही. भव्य हिमालय पर्वत, हिरवीगार वृक्षराजी आपली सदैव सोबत करत असते. वाटेत ५० ते ६० किमी वर असलेल्या मुक्तेश्वर या ठिकाणी आम्ही जाणार होतो. मुक्तेश्वर हे छोटंसं गाव पहाडात वसलेलं आहे. अत्यंत शांत आणि निसर्गरम्य वातावरणात. इथे एक प्राचीन भगवान शंकराचे मंदिर आहे. मुक्तेश्वर धाम म्हणून ते प्रसिद्ध आहे. हे मंदिर उंच पहाडावर आहे. ते ३५० वर्षांपूर्वीचं आहे. परंतु येथील शिवलिंग जवळपास साडेपाच हजार वर्षांपूर्वीचे असल्याचे सांगितले जाते. एका पौराणिक कथेनुसार भगवान शंकरानी इथे एका राक्षसाचा वध करून त्याला मुक्ती दिली होती. म्हणून हे मुक्ती धाम !
क्रमश:.....

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





पुढे.......

५) सीतेला दिसलेले शुभ शकुन → आशेचा पुनर्जन्म. सीता = जीवात्मा (आपण)
डावा अंग फडफडणे = अंतर्मनातील सकारात्मक ऊर्जा जागृत होणे.
तेज वाढणे = आत्मविश्वास परत येणे
पूर्ण अंधारातही आशेचा प्रकाश जन्म घेतो।
६) सम्पातीची भविष्यवाणी → धैर्य आणि वेळेवर विश्वास
सम्पाती = अनुभव आणि प्रतीक्षा
त्याला लगेच फल मिळत नाही
पण योग्य वेळ आल्यावर सर्व घडते
जीवनात काही गोष्टी योग्य काळ आल्यावरच घडतात।
रामायणातील "ज्योतिष" म्हणजे: फक्त ग्रह-नक्षत्र नाही तर मनाची अवस्था, कर्मांचे परिणाम आणि आत्म्याचा प्रवास जीवनासाठी गूढ शिकवण
मन अस्थिर असेल → संकेत समजून घ्या
संकटे येत असतील → तुम्ही योग्य मार्गावर असू शकता
अंतर्मन ऐका → तेच खरे मार्गदर्शक आहे
संयम ठेवा → प्रत्येक गोष्ट योग्य वेळी घडते
सत्य (राम) शेवटी जिंकतेच
■ रामायण आपल्याला सांगते :
"तुमच्या आतला राम जागृत झाला, की ग्रह, नक्षत्र, नियती — सर्व तुमच्या बाजूने वळतात."
रामायण हे केवळ काव्य नसून:
पाप नाश करणारे
ग्रहदोष दूर करणारे
दु:स्वप्न नष्ट करणारे
भुक्ती आणि मुक्ति देणारे
असे दिव्य ग्रंथ आहे।
भर्जनम् भवबीजानम् अर्जनम्
सुखसंपदाम् तर्जनम् यमदूतानाम्
रामरामेति गर्जनम्....
रामायणाचे वाचन, श्रवण आणि मनन केल्याने मन शुद्ध होते, संकटे कमी होतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते।
रामायण आपल्याला सांगते:
"तुमच्या आतला राम जागृत झाला, की ग्रह, नक्षत्र, नियती — सर्व तुमच्या बाजूने वळतात."

# विवेचनावर बोलू काही....

ज्योतिर्मय साहित्य

(मनाचे श्लोक - भाग ४१)

जय श्रीराम! समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांमधील हा ४१ वा श्लोक आणि त्यावर आपण केलेले विवेचन अत्यंत उद्बोधक, प्रगल्भ आणि डोळ्यात अंजन घालणारे आहे.

''बहु हिंडता'' या शब्दाचे जे तीन अर्थ लावले आहेत, ते अप्रतिम आहेत. पोटासाठीची वणवण (लौकिक), बाबा-बुवा आणि तीर्थक्षेत्रांची वणवण (धार्मिक/पारमार्थिक भ्रम), आणि जन्म-मरणाचा फेरा (आध्यात्मिक) या तीनही पातळ्यांवर मनाला आरसा दाखवण्याचे काम या विवेचनाने केले आहे.

श्रीकृष्ण आणि पांडवांची लिंबाच्या काडीची कथा या निरुपणाला अगदी अचूक न्याय देते. कडू लिंब जसा तीर्थस्नाने गोड होत नाही, तसेच अंतरंग शुद्ध न करता केवळ बाह्य कर्मकांड केल्याने मन शुद्ध होत नाही, हा सिद्धांत या कथेमुळे मनावर कायमचा बिंबला जातो.

विवेचनाचा शेवट माऊलींच्या ''सर्व सुखाचे आगर...'' या ओवीने करून समर्थांच्या राघवी वस्ती कीजे



या विचाराला संतांच्या एकात्मतेशी जोडले आहे, जे खूप सुंदर वाटले.

स्वसंवादाचे चारही प्रश्न अंतर्मुख व्हायला भाग पाडतात.

आपण बहुतांश आयुष्य पैसा आणि यश म्हणजेच सुख या भ्रमात धावण्यात घालवतो. पण एका मर्यादेनंतर लक्षात येते की, भौतिक सुखे केवळ आराम देतात, समाधान नाही.




समर्थ म्हणतात त्याप्रमाणे, खरी वणवण थांबते ती आत वळल्यावरच.

धार्मिक कृती ही केवळ एक शिस्त किंवा प्रक्रिया आहे, ते साध्य नाही. जसे साबणाने शरीर स्वच्छ होते, तसे नामस्मरणाने आणि चांगल्या विचारांनी मन स्वच्छ व्हायला हवे. जर देवळात जाऊनही बाहेर आल्यावर आपण कोणाचा द्वेष करणार असू, तर ती लिंबाची काडी ठरते.

उपवास शरीराचा होतो, पण वासनांचा आणि क्रोधाचा होत नाही. पूजा करताना जर डोक्यात व्यवहाराचे किंवा मत्सराचे विचार असतील, तर ते हिंडणे व्यर्थ आहे. ''विचारे मना अंतरा बोधवीजे'' म्हणजेच मनाला रोज समजावून सांगावे लागेल की, हे विकार तुझे हित करणारे नाहीत.

दैनंदिन जगण्याच्या व्यापात आपण अमर असल्यासारखे जगतो. पण जेव्हा या फेऱ्याची आणि मानवी जन्माच्या ध्येयाची जाणीव होते, तेव्हा जगातील छोट्या-छोट्या गोष्टींमधील आसक्ती कमी होते आणि मन राघवाच्या चरणी स्थिर होऊ लागते.

समर्थ या श्लोकात विचारे मना अंतरा बोधवीजे असे म्हणतात. विचार करण्याची शक्ती फक्त मानवाला आहे. आपण जगाला बोध (उपदेश) खूप करतो, पण समर्थ सांगतात की स्वतःच्या अंतर्मनाला बोध करा. जोपर्यंत आपले मन आपले ऐकत नाही, तोपर्यंत बाहेर कितीही हिंडलो तरी हित साध्य होणार नाही.

हे विवेचन केवळ वाचून सोडून देण्यासारखे नाही, तर थांबून, विचार करून स्वतःचा तळ तपासण्यास प्रवृत्त करणारे आहे.

पुढील भागाची प्रतीक्षा!लेखन असेच प्रवाही आणि मार्गदर्शक राहो. **

# बचेंद्री पाल - एव्हरेस्ट शिखरावर पोहचणारी पहिली भारतीय महिला


ज्योतिर्मय साहित्य



बचेंद्री पाल या फक्त एक गिर्यारोहक नाही, तर लाखो भारतीय मुलींसाठी, साहसाची प्रेरणा आहेत.

बचेंद्री पाल या पहिल्या भारतीय महिला आहेत ज्यांनी जगातील सर्वात उंच शिखर, माउंट एव्हरेस्ट जे ८८४८ मीटर उंच आहे ते सर केले आणि तो दिवस म्हणजे २३ मे १९८४, होय, म्हणजे बरोबर ४२ वर्षापूर्वीचा आजचाच दिवस.

बचेंद्री पाल यांचा जन्म २४ मे १९५४, रोजी नाकुरी (उत्तरकाशी, उत्तराखंड) येथे झाला. त्यांनी १९८४ साली एव्हरेस्ट सर केलं तेव्हा त्या ३० व्या वाढदिवसाच्या फक्त एक दिवस आधीचा दिवस होता. १९८४ मध्ये बचेंद्री पाल भारताच्या एव्हरेस्ट १९८४ मोहिमेचा सदस्या होत्या. ही भारताची चौथी एव्हरेस्ट मोहीम होती. १६ मे १९८४ ला ल्होत्से ग्लेशियरवर मोठी हिमस्खलन झाली. अर्ध्यापेक्षा जास्त संघ जखमी होऊन माघारी फिरला पण बचेंद्री आणि उरलेल्या सदस्यांनी हार मानली नाही, आणि २३ मे १९८४ दुपारी १ वाजून ०७ मिनिटांनी त्या एव्हरेस्टच्या उंच शिखरावर पोहोचल्या आणि ४३ मिनिटं तिथे राहिल्या. त्यांनी भारतीय तिरंगा आणि टाटा स्टीलचा ध्वज त्या शिखरावर फडकवला. आपल्या देशासाठी ही अभिमानाची बाब आहे.




बचेंद्रीचा जन्म एका गरीब भोटिया कुटुंबात झाला. वडील भारत-तिबेट सीमेवर किराणा मालाचा व्यापार करत.वयाच्या १२ व्या वर्षी शाळेच्या सहली दरम्यान त्या १३,१२३ फूट उंचीच्या शिखरावर चढल्यापासून त्यांना गिर्यारोहणाची आवड लागली. त्यांच्या कुटुंबाला त्यांनी शिक्षिका व्हावं असं वाटत होतं, पण बचेंद्रींनी गिर्यारोहण हाच मार्ग निवडला.१९८४ मधे एव्हरेस्ट सर केल्यावर ही त्या थांबल्या नाहीत. पुढेही त्यांनी अनेक मोहिमा केल्या:

१. १९८५: सर्व महिलांचा एव्हरेस्ट संघ नेतृत्व केलं

२. १९९४: हरिद्वार ते कोलकाता, २१५५ किमी गंगा नदीवर महिलांचा राफ्टिंग मोहीम यशस्वी केली

३. १९९७मध्ये अरुणाचल प्रदेश ते सियाचेन ग्लेशियरपर्यंत ४५०० किमीची भारतीय महिला ट्रान्स-हिमालयन मोहीम नेतृत्व केली

४. २०१३: उत्तराखंड पुरानंतर उच्च हिमालयीन गावांमध्ये बचावकार्यात सहभाग

बचेंद्री पाल यांना मिळालेले पुरस्कार खालीलप्रमाणे आहेत.

- पद्मभूषण - भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, २०१९, पद्मश्री - १९८४, अर्जुन पुरस्कार - १९८६, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड- १९९०

- राष्ट्रीय साहस पुरस्कार-१९९४.

अश्या अनेकविध पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत. आजही त्या वयाच्या ७२ व्या वर्षीही सक्रिय आहेत. त्या टाटा स्टील अडव्हेंचर फौंडेशन च्या संचालिका आहेत आणि५० सारख्या ५०+ महिलांच्या मोहिमा नेतृत्व करतात. अश्या या उत्साही, चिरतरुण भारतीय महिलेला मानाचा मुजरा.

# चला हसू या पुलंच्या लेखणीतले हसरे किस्से

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

१४. गुळाचा गणपती - बाप्पा

''गणपतीकडे आपण मागणं नाही, तक्रार करतो. बाप्पा, हे काय? प्रमोशन नाही झालं. बाप्पा ऐकतो, कारण त्याला माहितीये विसर्जनाला आपणच खांद्यावर घेणार.''

१५. व्यक्ती आणि वल्ली - हरितात्या


''हरितात्या म्हणाले, आज पाऊस येणार. पाऊस कसा यायचा? ते छत्री घेऊन बाहेर पडले की यायचाच .नाही आला तर म्हणायचे, आज हुलकावणी दिली!''

१६. अपूर्वाई - इंडियन टी

''वेटरने इंडियन टी आणली - वर दूध, खाली पाणी, मधे चहा पावडर तशीच. मी विचारलं, असा का? तो म्हणाला, सर, इंडिया इज युनिटी इन डायव्हर्सिटी. सो वी डिड नॉट मिक्स द टी.''

१७. बटाट्याची चाळ - पोस्टमन

''पोस्टमनने पत्र वाचलं, तुमचे यजमान वारले. बाई रडायला लागल्या. शेजारणीने वाचलं, अहो, यात तर परवा येतील लिहिलंय! पोस्टमनने च चे र ,वाचले होते




१८. गणगोत- आचारी

''आचाऱ्याने साबुदाण्याची खिचडी केली. पाहुणा म्हणाला, हे काय आहे? आचारी म्हणाला, साबुदाणा. पाहुणा म्हणाला, दाणे कुठे आहेत? हा तर साबूच!''

१९. नसती उठाठेव - दंतवैद्य

''दंतवैद्याने २ मिनिटात दात काढला, फी ५० रुपये. मी म्हटलं, २ मिनिटांचे ५०? डॉक्टर म्हणाले, दात काढायला २ मिनिटं, पण कसा काढायचा हे शिकायला २० वर्ष लागली. त्याचे ५०.''

२०. एक शून्य मी- झोपेच्या गोळ्या

''डॉक्टर म्हणाले, झोपेच्या गोळ्या घ्या. मी म्हणालो, घेतो, पण मग जागं राहावं लागतं... चुकून गिळल्या जाऊ नयेत म्हणून!''



२१. व्यक्ती आणि वल्ली - नारायण

''नारायण आजारी पडला तेव्हा सगळी चाळ भेटायला आली. तो म्हणाला, मेल्यावर अशीच गर्दी होईल, पण मग मला कळणार नाही!''

२२. पूर्वरंग - संगीत

''शेजाऱ्याने पेटी वाजवून डोकं उठवलं. मी सूड म्हणून पेटी शिकायला लागलो. मी वाजवायला लागल्यावर त्याने पेटी वाजवायची बंद केली. माझा सूड पूर्ण झाला.''

२३. मैत्र - मित्र

''मित्र म्हणजे कोण? जो तुमच्या बायकोसमोर तुमची स्तुती करेल आणि तुम्ही नसताना तुमच्या बायकोला म्हणेल, ताई, तुम्ही ह्याच्या नादी कशा लागलात?''

२४. खोगीरभरती - नोकरी

''मुलाखतीला गेलो. साहेब म्हणाले, तुम्हाला किती पगार अपेक्षित आहे? मी म्हटलं, तुम्ही देऊ शकाल तितका. साहेब म्हणाले, आम्ही काहीच देऊ शकत नाही. मी म्हटलं, चालेल, मी पण काहीच काम करणार नाही.''

२५. हसवणूक- हसण्याचं महत्व

''डॉक्टर म्हणाला, दिवसातून तीन वेळा हसा. मी म्हटलं, डॉक्टर, लग्न झालंय माझं. दिवसातून तीन वेळा बायकोमुळेच हसावं लागतं. एक्स्ट्रा हसायला वेळच कुठेय?''




# सौंदर्याची खरी व्याख्या


ज्योतिर्मय साहित्य

मी डिग्री फायनल ईयरला असताना आम्हाला राज्यशास्त्र या विषयासाठी प्राध्यापक लक्षेट्टे सर होते. सर म्हणजे अतिशय प्रतिभावान व्यक्तीमत्व. शैक्षणिक कार्यासाठी सरांना बाहेरगावी जायचे होते. आदल्या दिवशी सरांनी आम्हाला सांगितलं की, ''उद्यापासून मी ७-८ दिवस नाही. मी येईपर्यंत दुसऱ्या मॅडम तुम्हाला शिकवतील. त्यांना चांगलं सहकार्य करा. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची तुम्ही अचूक उत्तरे देण्याचा प्रयत्न कराल अशी मी आशा बाळगतो''. सर स्वतःच बोलत होते. आणि आम्ही सर्वजण जशी फाशीची शिक्षा सुनावली जाते ना अगदी तशा अवस्थेत होतो. नवीन मॅडम म्हणजे आता काय काय विचारतील? या विचाराने सुन्न झालेले आम्ही. तास संपला सर गेले. लोकप्रशासन विषयाचे सर क्लास मध्ये येईपर्यंत आम्ही खाली माना घालून बसलो. सर आले. सर शिकवताना सरांकडे आमचं लक्षच नव्हतं.

दुसरा दिवस उजडला. आम्ही सगळे क्लास मध्ये शांत बसलेलो. मॅडम आल्या. मॅडमचा अतिशय काळाकुट्ट रंग, अंगावर फिकट गुलाबी रंगाचा अतिशय साधा आणि जुना कॉटन ड्रेस, चेहऱ्यावर खूप सारे मोठे मोठे पिंपल्स, साधीशी टिकली, केसांना खूप जास्त तेल लावून केस चापून चोपून घातलेली दुमडलेली वेणी, कानात इअरिंग नाही, हातात ना एखादी बांगडी ना घडी, ना गळ्यात एखादी साखळी, अंगभर ओढणीने सारं अंग झाकलेलं. हे मॅडमचं बाह्य सौंदर्य. मॅडमच्या हातात भली मोठी चार इंग्रजी पुस्तकं. मॅडमला पाहून आमच्या जीवात जीव आला. आम्हाला वाटलं मॅडम इतक्या साध्या सुध्या ह्या काय शिकवतील? तुमचा तुम्ही अभ्यास करत बसा. असं म्हणतील असं आम्हाला वाटलं. पण झालं उलटंच. मॅडम फाडफाड इंग्लिश बोलायल्या लागल्या तेंव्हा आमचं ततंपपं झालं. मॅडम आम्हाला इंग्लिशमध्ये बोलू लागल्या. आम्हाला जेवढं जमतं तेवढं आम्ही बोललो.

मग मॅडम विषयाकडे वळल्या. प्रश्नावली सुरु झाली. मॅडमनी प्रश्न विचारला त्या प्रश्नाचं सविस्तर, निटसं व मॅडमला अपेक्षित असं उत्तर आम्हाला देता आलं नाही. मग मॅडम स्वतःच प्रश्न व उत्तर सांगू लागल्या.

१) हू इस द फादर ऑफ पॉलिटिकल सायन्स? - एरिस्टोटल



२) व्हॉट इस द मेअनिंग ऑफ पॉलिटिकल सायन्स ? - पॉलिटिकल सायन्स इस द अकॅडेमीक डिसिपलीन ऑफ सिस्ट्मेटिकली स्टडिंग पॉलिटिकल सिस्टिम्स , गव्हर्नमेंट्स पॉवर अँड पब्लिक पॉलिसिस युसिंग सायंटफिक अँड अनालीटिकल मेथडसं.




मॅडमची इंग्लिश ऐकून आम्ही मॅडमकडे डोळे वाफारून बघू लागलो. प्लऱ्यूटो, हॉब्ज, लॉक, रुसो, ऍरिस्टोटल, कॅटलीन, कौटील्य, चाणक्य अशा कितीतरी विचारवंतांची प्रस्तावना मॅडमनी चुटकीसरशी अगदी मिनिटात सांगितली.? राज्यशास्त्र म्हणजे काय? राज्यशास्त्राचा अर्थ आणि महत्व, राज्यशास्त्र अभ्यासाचे स्वरूप, व्याप्ती, विश्लेषण, राजकीय संस्था, राजकीय प्रक्रिया, राजकीय विचार, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राज्यशास्त्राचे जनक, त्यांची सविस्तर व विस्तृत माहिती. या सर्व प्रश्नांची उत्तरे मॅडमनी सविस्तर सांगितली.

त्या तासात अवांतरही बरीच चर्चा झाली. मॅडम कडून आम्हाला जी माहिती, जे ज्ञान, ज्या गोष्टी शिकायल्या मिळाल्या त्या आजही तशाच स्मरणात साठवून आहेत. तास संपला. जाता-जाता मॅडम म्हणाल्या, ''तुम्ही डिग्री लेवलचे विद्यार्थी आहात. ध्येय वाटचालीच्या प्रस्थानासाठी तयार व्हा. ध्येय निश्चित करा. त्यावर ठाम रहा. बाकीची स्टडी उद्या''. असं म्हणून मॅडम क्लास बाहेर निघून गेल्या. कधी एकदा दुसरा दिवस उजाडतो आणि कधी एकदा मॅडम क्लास मध्ये येतात. असं झालं होतं आम्हाला. पुढील पाच दिवस मॅडमनी आम्हाला पुस्तका बरोबर जनरल नॉलेजही दिलं. मॅडमनी सांगितलेल्या गोष्टी आयुष्य जगण्यासाठी खरंच खूप महत्वपूर्ण ठरल्या.

खऱ्या सौंदर्याची खरी व्याख्या हीच तर आहे. जिथे दिसण्यापेक्षा हुशारीला, बुद्धिमत्तेला, विचारांना आणि इतरांकडे बघितल्या जाणाऱ्या चांगल्या दृष्टीकोनाला प्रथम प्राधान्य वा महत्व दिले जाते. रंग रंगोटी किंवा भरपूर मेकअप करून आपण बाह्य सोंदर्य तर खुलवू शकतो. पण मग आतील सोंदर्याचं काय? खरे तर काळा रंग म्हटला कि, लोकांच्या मनात एक वेगळाच विचार येतो. लोक चार हात दूर होतात. आजही काळ्या रंगाची अवहेलना केली जाते. भारताचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु. यांचे दिसणे महत्वाचे आहे कि, त्या ज्या पदावर विराजमान आहेत ते पद महत्वाचे आहे. अर्थात त्यांची साधी राहणी, सुंदर विचार, शालिनता, त्यांचे पद, प्रतिष्ठा. त्यांनी त्यांच्या एका मुलाखतीत असं सांगितलं सुद्धा कि, त्या चेहऱ्यावर पावडर सुद्धा लावत नाहीत.

चित्रपट सृष्टीत आज अशा कित्येक अभिनेत्री आहेत. ज्या रंगाने नाही तर अभिनयाने प्रसिद्ध आहेत. पण तरिही, आजही बऱ्याच ठिकाणी बाह्य सुंदरतेलाच महत्व दिले जाते. आणि बुद्धीमत्तेला सरळ सरळ नाकारलं वा डावलल्या जातं. सौंदर्य टिकणारं नाही. बाह्य सुंदरता ही क्षणिक आहे. पण आपली बुद्धिमत्ता, हुशारी, सुंदर विचार या गोष्टी मात्र निरंतर टिकून राहतात. यावर कधीच सुरकुत्या येत नाहीत. सुंदरतेची व्याख्या करायचीच आहे तर सुंदर विचारांची, सुंदर ज्ञानाची, सुंदर अलौकिक बुद्धिमत्तेची, सुंदर आचार विचारांची, कला गुणांची, विचारांतील वैचारिक विद्वत्तेची, वागण्या बोलण्यातील शालिनतेची, इतरांकडे चांगल्या दृष्टीकोनाने बघितल्या जाणाऱ्या त्या सुंदर डोळ्यांची, गरजूंना मदत करणाऱ्या त्या सुंदर हातांची, इतरांच्या मदतीसाठी धाव घेणाऱ्या त्या पावलांची, सर्वांबाबतीत चांगले व सुंदर विचार करणाऱ्या त्या सुंदर मनाची व्याख्या करा.

आम्ही मॅडमच्या साधेसुधे पणाकडे पाहिलं. मॅडमला पाहताक्षणी त्यांना नकळतपणे कदाचित कमीही लेखलं. पण त्यांची हुशारी, अलौकिक बुद्धिमत्ता, इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, त्यांचे जनरल नॉलेज. मॅडमकडे असलेल्या या सर्व गोष्टींचे सौंदर्य अधिक खुलून व उठून दिसत होते. साधी राहणी उच्च विचारसरणी या वाक्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मॅडम. माणसाच्या बाह्य सौंदर्यापेक्षा ज्ञानरूपी सौंदर्य अधिक खुलून दिसणारं असतं. हे आपण नाकारूही शकत नाही. आणि कांहीजण स्वीकारूही शकत नाहीत.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559